# <u>सूचना पत्रक</u>

## SIAC ENTRANCE EXAMINATION- 2018

## प्रवेश परीक्षा-२०१८

**( UPSC ,नागरी सेवा परीक्षा- २०१९ (IAS/IFS/IPS .etc.) च्या परीक्षापूर्व प्रशिक्षण - २०१८-१९ )**

---

## ऑनलाईन (Online) अर्ज भरण्याची कार्यपध्दती व सूचना

केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या नागरी सेवा परीक्षा -२०१९ च्या पूर्व प्रशिक्षणाकरीता ११ महिने पूर्णवेळ विनामूल्य प्रशिक्षण देण्यासाठी राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था , मुंबई येथे प्रवेशासाठी **प्रवेश परीक्षा रविवार दिनांक ०४ नोव्हेंबर २०१८ रोजी फक्त मुंबई केंद्रावर** घेण्यात येईल. प्रस्तुत जाहिरातीत नमूद केलेल्या अटींची पूर्तता करणाऱ्या उमेदवारांकडून ऑनलाईन (Online) पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत .

**१.प्रवेश क्षमता** :एकूण- **१२०** पैकी १) SIAC संस्थेची प्रवेश क्षमता : **१००**

२) अल्पसंख्यांक आयोग (MINORITY) द्वारा अनुदानीत -**१०**

३) डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था,पूणे (BARTI ) द्वारा अनुदानीत -**१०**

१. सर्व पात्र उमेदवारांनी अर्ज या कार्यालयाच्या https://www.siac.org.in या अधिकृत संकेतस्थळावर तसेच http://eforms.co.in/siac२०१८ या संकेतस्थळावर` **दिनांक १३.८.२०१८ ते दि. १४.९.२०१८** या कावधीत सादर करणे आवश्यक राहील. ऑनलाईन अर्ज स्वीकारण्याचा अंतीम दिनांक व वेळेनंतर संकेतस्थळावरील अर्ज भरण्याची लिंक बंद करण्यात येईल.

२. या कार्यालयाचे अधिकृत संकेतस्थळ https://www.siac.org.in तसेच http://eforms.co.in/siac२०१८ या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज पूर्ण माहिती भरल्यानंतर फॉर्म अंतिमत: जमा करता येईल. फॉर्म जमा केल्यानंतर भारतीय स्टेट बँकेत शुल्क भरण्याबाबतचे चलन ऊपलब्ध होईल. सदर चलनाची प्रिंट काढून त्या चलनामार्फतच उमेदवाराने चलनात नमूद असलेले आवश्यक ते शूल्क भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेमध्ये कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी भरावे. उमेदवाराने आवश्यक शूल्क भरल्याची खात्री करावी. **फॉर्म जमा केल्यानंतर परीक्षा शूल्क भरने आवश्यक आहे,अन्यथा आपला अर्ज अपात्र ठरविण्यात येईल.**

३. सदर परिक्षेसाठी अर्ज फक्त ऑनलाईन पदधतीनेच भरता येईल. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारले जानार नाहीत. कोणत्याही उमेदवाराने ईतर कोणत्याही प्रकारे या कार्यालयास अर्ज सादर केल्यास सदर अर्ज स्वीकारण्यात येनार नाहीत.

४. प्रवेश परीक्षा अर्ज ऑनलाईन पध्दतीने स्वीकारण्यात येणार असल्याने अर्ज व कोणतेही शैक्षणिक अर्हतेबाबतचे प्रमाणपत्र या कार्यालयात पाठविण्यात येऊ नयेत. प्रमाणपत्रे अंतिम निवड प्रक्रियेमध्ये तपासण्यात येतील.(केवळ सही व फाटो स्कन करुन अपलोड करावा) अपलोड करताना फाटोची व सहीची साईज प्रत्येकी ३५केबीपेक्षा कमी असने आवश्यक आहे. ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरताना काही चूका झाल्यास किंवा त्रुटी राहील्यास कोणत्याही टप्प्यावर अर्ज नाकारला गेल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबधीत उमेदवाराची राहील.व याबाबत कोणत्याही प्रकारची तक्रार करता येनार नाही. ऑनलाईन अर्जात भरलेली माहीती बदलता येनार नाही.

५. उमेदवाराने अर्जासोबत माहिती सादर करताना कार्यान्वीत असलेला भ्रमणध्वनी (मोबाईल) क्रमांक व ई-मेल आयडी नमूद करावा, जेणेकरून आपणास संपर्क करून आवश्यक ती माहिती देणे सुलभ होईल. उमेदवारांनी ऑनलाईन अर्जाव्दारे नोंदवीलेला भ्रमणध्वनी व ई-मेल आयडी हा अपूर्ण अथवा चूकीचा असल्यास, तसेच मोबाईल क्रमांक NCPR Registered (DND) असल्यामूळे संपूर्ण प्रवेश प्रक्रियेदरम्यान त्याव्दारे पाठविल्या जाणा-या सूचना, संदेश व माहिती उमेदवारांना प्राप्त न झाल्यास त्याची संपूर्ण जवाबदारी संबंधित उमेदवाराची राहील तसेच या कार्यालयाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रवेश प्रक्रिये दरम्यान वेळोवेळी सुचना देऊन प्रवेश परिक्षेच्या माहितीबाबत अदयावत राहण्याची जवाबदारी संबंधित उमेदवाराची राहील.

६. ज्या उमेदवारांनी ऑनलाईन नोंदणी केली आहे आणि आवश्यक परिक्षा शुल्क मुदतीत अदा केले आहे त्यांना प्रवेश परिक्षेचे (CET) प्रवेशपत्र (HALL TICKET) त्यांच्या लॉग इन आयडी व्दारे अधिकृत संकेतस्थळा वरून डाऊनलोड करून घेता येईल. कोण्त्याही उमेदवारास पोष्टाने प्रवेशपत्र पाठविले जानार नाही याची नोंद घ्यावी.

७. उमेदवारांना ऑनलाईन अर्ज भरण्याबाबत काही अडचणी आल्यास त्यांनी मो.क्र. **०८२९६१७५२५८** या क्रमांकावर संपर्क साधावा. किंवा कार्यालयीन वेळेत ऑ.फोन नं. **०२२ २२०६१०७१** या क्रमांकावर संपर्क साधावा.

८. उमेदवाराने अर्ज भरल्यानंतर अर्जावर नमूद केलेला अर्ज क्रमांक (Application No.) व अर्जामध्ये नमूद केलेला पासवर्ड जतन करुन ठेवावा.

**९. प्रवेश अर्ज ऑनलाईनवर भरण्याचे वेळापत्रक -**

| | | |
|---|---|---|
| १ | ऑनलाईन (ONLINE)अर्ज भरण्यास सुरुवात दिनांकापासून | १३.८.२०१८ |
| २ | अर्ज भरण्याचा शेवटचा दिनांक | १४.९.२०१८ |
| ३ | प्रवेश पत्र ( HALL TICKETS ) उपलब्ध होतील | २३.१०.२०१८ ते ०४.११.२०१८ |
| ४ | प्रवेश परीक्षा( ENTRANCE EXAM) | ०४.११.२०१८ |

**१०. परीक्षा शुल्काची आकारणी व शुल्क भरणा प्रक्रिया ( ऑनलाईन पेमेंट किंवा चलनाद्वारे)**

सदर प्रवेश प्रक्रियेत खालील प्रमाणे शुल्क आकारले जाणार असून सदर प्रवेश परीक्षा शुल्क हे नापरतावा राहील.

<table>
<tr><td>अ.क्र.</td><td colspan="3">आवश्यक प्रवेश परीक्षा शुल्क</td></tr>
<tr><td>१</td><td>खुला प्रवर्ग रु. ३००/-</td><td>राखीव प्रवर्ग रु.१५०/-<br>अ.जा./अ.ज./वि.जा./भ.ज./इ.मा.व./वि.मा.प्र.</td><td rowspan="2">प्रवेश परीक्षा शुल्क जमा करण्याचा कालावधी<br>**१६.०८.२०१८**<br>ते<br>**१९.०९.२०१८**</td></tr>
<tr><td>२</td><td colspan="2">१) डेबिट कार्ड, क्रेडिट कार्ड अथवा नेटबँकिंगद्वारे ऑनलाईन परीक्षा शुल्क अदा करता येईल.<br>किंवा<br>२) भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेत ऑनलाईन अर्ज भरताना प्राप्त झालेल्या विहीत चलनाव्दारेच रोखीने भरता येईल.</td></tr>
</table>

१. ऑनलाईन अर्ज सादर केल्यानंतर डेबिट कार्ड, क्रेडिट कार्ड अथवा नेटबँकिंगद्वारे ऑनलाईन परीक्षा शुल्क अदा करता येईल. किंवा

२. प्रवेश परीक्षा शुल्क हे भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेत ऑनलाईन अर्ज भरताना प्राप्त झालेल्या विहीत चलनाव्दारेच रोखीने भरता येईल.

३. प्रवेश परीक्षा शुल्क हे बॅंक प्रोसेसिंग चार्जेस वगळून आहेत. याशिवाय संबंधित बँकेकडून जे प्रवेश प्रक्रिया शुल्क आकारले जाईल ते शुल्क उमेदवाराने भरावयाचे आहे.

११. प्रवेश परीक्षा केंद्रावर प्रवेशपत्रासह परीक्षा सुरू होण्यापूर्वी एक तास अगोदर उपस्थित रहाणे आवश्यक आहे. उशीरा येणा-या व प्रवेशपत्र न आणणा-या उमेदवारांना प्रवेश परीक्षे करीता प्रवेश दिला जाणार नाही तसेच उमेदवारांनी स्वत:चे फोटो असलेले ओळखपत्र उदा. वाहन परवाना, पॅनकार्ड, निवडणूक ओळखपत्र, आधारकार्ड इ. सोबत आणणे बंधनकारक राहील.

१२. उमेदवारांनी ऊत्तरे लिहीण्यासाठी अथवा चिन्हांकीत करण्यासाठी फक्त काळया शाईच्या (Black Ball Pen) बालपेनचा वापर करावा.अन्य कोणत्याही साधनाचा वापर केल्यास संबधीत उमेदवाराची उत्तरपत्रीका तपासली जाणार नाही याची उमेदवाराने नोंद घ्यावी.

**१३. प्रवेश परीक्षा पध्दत : प्रवेश परीक्षा एकूण-२०० गुणांची असून , UPSC ,नागरी सेवा (पूर्व ) परीक्षेच्या अभ्यासक्रमावर आधारीत राहिल.**

| **विषय** | **प्रश्नांची संख्या** | **एकूण गुण** | **माध्यम** | **परीक्षेचा कालावधी** | **परीक्षेचे स्वरुप** |
|---|---|---|---|---|---|
| सामान्य अध्ययन Section -I GS | ५० | १०० | English/Hindi | सकाळी-११.०० ते ०१.०० वाजेपर्यत- **एकूण -२ तास** | **वस्तुनिष्ठ Objective type (MCQ) Negative marking one-third (०.३३) of the marks assigned to that question** |
| सामान्य अध्ययन Section - II CSAT | **४०** | **१००** | **English/Hindi** | | |

**सामान्य अध्ययन Section - II CSAT हा qualifying section असल्याने किमान ३३% म्हणजे १०० गुणांपैकी ३३ गुण असणे अनिवार्य आहे.**

## **अभ्यासक्रम**

**१४.** SIAC प्रवेश परीक्षा ही नागरी सेवा पूर्व परीक्षा-२०१८( UPSC,CIVIL SERVICES PRELIMINARY EXAMINATION-2018) च्या अभ्यासक्रमावर आधारीत असेल. प्रवेश परीक्षा वस्तुनिष्ठ स्वरुपाची आहे. तसेच प्रत्येक चुकीच्या उत्तराला त्या प्रश्नाच्या मार्कांच्या १/३ (०.३३) इतके मार्क कमी करण्यात येतील. परीक्षेची वेळ - ११.०० ते १.०० वा. परीक्षा एकूण २ तास प्रवेश परीक्षेची प्रश्नप्रत्रिका इंग्रजी व हिंदी भाषेमध्ये असेल. अभ्यासक्रम खालील प्रमाणे आहे.

## SYLLABUS

### Section- I ( GENERAL STUDIES-100 Marks )

- Current events of national and international importance.
- History of India and Indian National Movement.
- Indian and World Geography-Physical, Social, Economic Geography of India and the World.
- Indian Polity and Governance-Constitution, Political System, Panchayati Raj, Public Policy, Rights Issues, etc.
- Economic and Social Development-Sustainable Development, Poverty, Inclusion, Demographics, Social Sector Initiatives, etc.
- General issues on Environmental ecology, Bio-diversity and Climate Change - that do not require subject specialization.
- General Science.

### Section- II ( CSAT-100 Marks )

- Comprehension;
- Interpersonal skills including communication skills;
- Logical reasoning and analytical ability;
- Decision making and problem solving;
- General mental ability;
- Basic numeracy (numbers and their relations, orders of magnitude, etc.) (Class X level), Data interpretation (charts, graphs, tables, data sufficiency etc. — Class X level);

**Note 1 : Section- II** will be a qualifying paper with minimum qualifying marks fixed at 33%.
**Note 2 :** The questions will be of multiple choice, objective type.

**इतर महत्वाच्या सूचना :**

१) संस्थेच्या प्रवेश व मर्यादित वसतिगृह प्रवेश उपलब्धतेनुसार गुणवत्ता व प्रचलित शासन निर्णय नियमांनुसार प्रवेश देण्यात येतील.

२) परीक्षेचा अभ्यासक्रम , परीक्षेसंबंधी सर्व माहिती , सूचना www.siac.org.in या बेबसाईटवर उपलब्ध आहे.

३) एस आय ए सी संस्थेमध्ये पूर्व परीक्षा व मुख्य परीक्षाकरीता प्रशिक्षण सत्राचा लाभ घेतलेल्या माजी विद्यार्थ्यांना प्रवेश परीक्षेस बसता येणार नाही.

४) संस्थेच्या संपूर्ण प्रशिक्षण काळात उमेदवारास नोकरी अथवा इतर अभ्यासक्रमात सहभाग घेता येणार नाही.

५) वैद्यकीय पदवी धारकांनी intership पूर्ण करणे आवश्यक आहे.

६) उमेदवार महाराष्ट्राचा रहिवासी असला पाहिजे ( Domicile of Maharashtra **Certificate** ) किंवा उमेदवार महाराष्ट्र कर्नाटक वादग्रस्त सीमा भागातील रहिवासी असल्यास शासन निर्णय क्र. रा.प्र.व्य १०१८(/१७१/९८)/ म.शि.-१ दिनांक २४.४.२००० नुसार महाराष्ट्र कर्नाटक वादग्रस्त सीमा भागातील निर्देशित गाव किंवा शहारातील संस्थेमधून उत्तीर्ण झाल्याचे नमूद करणे आवश्यक असेल. तसेच अर्जासोबत संबधित विद्यार्थ्यांचे /विद्यार्थीनीचे पालक महाराष्ट्र कर्नाटक सीमा भागातील रहिवासी असल्याचे जिल्हाधिकारी यांचे प्रमाणपत्र आणि विद्यार्थी पात्रता परीक्षा संस्थेतून झाल्याचे व त्याची/तिची मातृभाषा मराठी असल्याचे तसे संस्थेच्या प्राचार्याचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. तसेच इ. १० वी ची परीक्षा मराठी विषय घेऊन उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र आवश्यक आहे.

७) प्रवेश परीक्षेला बसणाऱ्या विद्यार्थ्यांनी माबाईल फोन , माहिती तंत्रज्ञान साधने व किमती वस्तू जवळ बाळगू नयेत.

८) अर्ज ऑनलाईन पध्दतीने स्वीकारण्यात येणार असल्याने अर्ज व कोणतेही शैक्षणिक अर्हतेबाबतचे प्रमाणपत्र या कार्यालयात पाठविण्यात येऊ नयेत. सर्व कागदपत्रे अंतिम निवड प्रक्रियेमध्ये तपासण्यात येतील.

सही/-
(डॉ.एम.बी.भिडे)
संचालक
राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था, मुंबई